पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, जून २०१९, खंड १८, अंक ३, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● सावधान

५ ● निवडणूक २०१९ : संदर्भ आणि आव्हाने

१९ ● वास्तव वृद्धाश्रमांचे

२५ ● जिकडे - तिकडे


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी


वार्षिक वर्गणी २००/- रुपये **(परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website-http://www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १८ (अंक ३) जून २०१९**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- ◆उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ◆अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ◆निःपक्ष व साधार
- ◆सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- ◆मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ◆निवडक साहित्याचे संकलन
- ◆संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ◆संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# सावधान

लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणा-या निवडणुकांमध्ये कोणत्याही एखाद्या उमेदवाराच्या पारड्यात आपल्या पसंतीचे मत टाकत असताना मतदार नेमक्या कोणत्या घटकांचा विचार करत असतो, याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न अलीकडील काळात अनेक अभ्यासक करत असताना दिसतात. उमेदवाराचा पक्ष, त्याची जात, धर्म, वर्ण, पंथ, भाषा, वय, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, चारित्र्य, वक्तृत्व, अभ्यास, पूर्वानुभव, पक्षीय निष्ठा, लोकसंपर्क, लोकाभिमुखता, माध्यमांमधील व माध्यमांनी निर्माण केलेली त्याची प्रतिमा, प्रचार व संपर्कयंत्रणा, प्रचाराचे प्रमाण, प्रचारसाहित्याची गुणवत्ता व परिणामकारकता, पैसा, मालमत्ता...अशांसारख्या विविध निकषांचा विचार आपले मत एखाद्या विशिष्ट उमेदवाराला देत असताना मतदार करत असतात अथवा असावेत, हे तर उघडच आहे. परंतु, निकषांच्या या भरगच्च यादीतील प्रत्येक निकषाला प्रत्येक मतदाराच्या प्राधान्यक्रमात नेमके किती महत्त्व प्रदान केले जाते, हे शोधणे मात्र अतिशयच दुष्कर ठरते. मुख्य म्हणजे, कोणत्याही निवडणुकीमध्ये मतदान करत असताना मतदार तात्कालीक मुद्यांना कितपत महत्व देतात आणि समाजजीवनाच्या पोताशी व राजकारणाच्या दर्जाशी निगडित असणा-या दीर्घकालीक मूल्यात्मक पैलूंची बूज कितपत राखतात, हा खरा कळीचा भाग ठरतो. दुस-या शब्दांत सांगायचे तर, मतदान करत असताना आपण सारासार विचार करून सावध बुद्धीने निवड करत असतो का, याबाबतचा कौल, खरे म्हणजे, सगळ्यांनीच दरवेळी सजगपणे घ्यायला हवा. कारण, आपण दिलेल्या कौलाचा अन्वय निवडणुकीनंतर सत्ताधीश होणारे सरकार व त्या सरकारचे धुरीण नेमके कशा प्रकारे लावतील यांवर आपले मतदार म्हणून काहीच नियंत्रण राहणे शक्य नसते. आपण केवळ सरकार निवडून देऊ शकतो परंतु त्या सरकारने मग कोणती धोरणे व कार्यक्रम राबवावेत यांवर मात्र आपले काहीही नियंत्रण प्रातिनिधिक लोकशाहीच्या आपण स्वीकारलेल्या 'मॉडेल'मध्ये राहत नसते व नाही. नेमक्या याच वस्तुस्थितीचा मग (गैर)फायदा सत्ताधा-यांकडून उठवला जाण्याची शक्यता असते.



भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने अगदी अलीकडेच आयोजित केलेल्या एका परिसंवादादरम्यान, राज्यशास्त्राचे विख्यात अभ्यासक व भाष्यकार सुहास पळशीकर यांनी हेच वास्तव अधोरेखित केले. केंद्रामध्ये नवीन सरकार स्थानापन्न करण्यासाठी केलेल्या मतदानानंतर आता, सुजाण नागरिक आणि लोकशाही राज्यव्यवस्थेच्या गाभामूल्यांच्या संरक्षणाबाबत आस्था बाळगणारे समाजमनस्क या उभय नात्यांनी येत्या काळात आपल्याला का व किती आघाड्यांवर सावध राहावे लागणार आहे, याचा विचक्षण आलेख प्रा. पळशीकर यांनी त्यांच्या विवेचनाद्वारे चितारला. मतदानासाठी उत्साहाने बाहेर पडून लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यात आपली उत्सवप्रियता दिसून येत असली तरी, मतदान करणे ही खरोखरच किती गांभीर्याने घेण्याची बाब आहे, याचे भान प्रा. पळशीकर यांचे या अंकात सादर केलेले विवेचन आपल्या सगळ्यांनाच पुरेपूर आणून देईल. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकीय

# निवडणूक २०१९ : संदर्भ आणि आव्हाने

कोणत्याही निवडणुकीसंदर्भात चर्चा अगर विचारविनिमय करत असताना, 'राजकारण' नावाच्या लोकव्यवहाराचे आपल्या देशात अलीकडील काळात दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांवरून प्रसारित केल्या जाणा-या 'रिॲलिटी शोज्' मध्ये जे रूपांतर झालेले आहे अथवा घडवून आणले गेलेले आहे, त्यांतून बाहेर येण्याची गरज आहे. 'राजकारण' म्हणजे नेमके काय, आपल्या डोळ्यांसमोर साकारणारे राजकारण नेमके आहे तरी कसे...अशांसारख्या प्रश्नांचा निदान काही प्रमाणात तरी उलगडा आपल्याला होण्याच्या शक्यता त्यांखेरीज उमलणार नाहीत. दूरचित्रवाणीवरील वाहिन्यांवर 'कौन बनेगा प्रधानमंत्री...? ',अशांसारख्या शीर्षकांचे जे खेळ रंगताना आपण आताशा बघतो अशा खेळांपासून स्वतःला अलग केल्याखेरीज भवतालातील राजकारण व राजकीय वास्तव यांचे सम्यक् आकलन आपल्याला होऊ शकणार नाही. आपल्या देशातील माध्यमविश्वाने आणि वाहिन्यांनी प्रचलीत राजकारणाचे रूप-स्वरूप एखाद्या रेखाचित्रासारखे (कॅरिकेचर) बनविलेले आहे. निवडणुकीतील बाजी मारून पंतप्रधान कोण बनेल, हे अचूकपणे जो सांगू शकेल तोच खरा सर्वश्रेष्ठ राज्यशास्त्रज्ञ, अशी काही तरी एक व्याख्या जी या सगळ्यांतून प्रस्थापित होते अथवा होऊ पाहते, तिच्यामधून बाहेर येणे ही राजकीय व्यवहाराचे आपले वाचन पायाशुद्ध बनविण्याची, म्हणूनच, पूर्वअट ठरते. देशाचा अथवा राज्याचा कारभार चालविण्यासाठी 'सरकार'नामक यंत्रणा अथवा व्यवस्था तयार करून देणे वा निवडून देणे, हे प्रत्येकच निवडणुकीचे उद्दिष्ट असते. हे नित्यकर्म करत असतानाच, काही वेळा, निवडणुकीद्वारे असे काही तरी घडते की ज्यामुळे राजकारणाला एकदम कलाटणीच मिळते. राज्यशास्त्राच्या तांत्रिक परिभाषेत अशा निवडणुकीला 'क्रिटिकल इलेक्शन' (कलाटणी देणारी निवडणूक) असे म्हटले जाते.



एखादी निवडणूक 'क्रिटिकल' अथवा कलाटणी देणारी ठरली याचा साक्षात्कार आपल्याला ती निवडणूक झाल्यानंतरच होत असतो. येणा-या १०-२० वर्षांतील राजकारणाला या निवडणुकीपायी कलाटणी मिळणार आहे, याचा पत्ता निवडणूक चालू असताना आपल्याला बहुधा नसतोच. एखादी निवडणूक कलाटणीपूर्ण आहे अथवा ठरली हे ठरवायचे तरी कसे, असा प्रश्न या संदर्भात मग कोणीही उपस्थित करील. तर, एखाद्या निवडणुकीद्वारे देशाच्या राजकीय व्यवस्थेमध्ये काही नवीन शक्तींचा उदय संभवतो का..., राजकीय व्यवस्थेतील प्रचलीत शक्तींची फेरमांडणी या निवडणुकीद्वारे घडून येईल का अथवा येते का..., निवडणुकीनंतर देशातील राजकीय व्यवस्थेचे रंगरूप कसे दिसेल..., त्या व्यवस्थेकडे आपण कोणत्या दृष्टीने पाहू..., राजकारणाची बदललेली घडी देशातील राजकीय पक्ष व नागरिक कशी समजावून घेतील, अधिक तांत्रिक परिभाषेमध्ये बोलायचे तर, देशातील पक्षपद्धती व पक्षव्यवस्था निवडणुकीपश्चात कशी असेल अथवा कशी दिसेल...अशांसारख्या घटकांवर किंवा बाबींवर दीर्घकाळ परिणाम घडविण्याची ताकद असलेली निवडणूक 'क्रिटिकल इलेक्शन' गणली जाते.

'कलाटणी देणारी निवडणूक' या व्याख्येमध्ये बसू शकतील अशा 'क्रिटिकल' निवडणुका आपल्या देशात लोकसभेसाठी आजवर झालेल्या १६ निवडणुकांमध्ये मोजक्याच गणता येतील. १९६७ सालातील लोकसभा निवडणूक आणि १९७१ साली झालेली लोकसभेची निवडणूक काही अंशी 'क्रिटिकल' या सदरात जमा करता येईल. १९७१ सालातील निवडणूक 'काही अंशीच क्रिटिकल म्हणता येईल', असे म्हणण्याचे कारण म्हणजे, १९७१ सालची लोकसभेची निवडणूक ही वास्तवात १९६७ सालातील लोकसभा निवडणुकीचे पुढील पाऊल म्हणून गणावी लागते. या दोन्ही निवडणुका कलाटणी देणा-या गणाव्या लागतात कारण, पुढे ब-याच काळानंतर ज्याचा निर्देश 'अन्य मागासवर्गीयांचे राजकारण' अशा शब्दावलीद्वारे करण्यात येऊ लागला. त्याचा उगम आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये १९६७ सालातील निवडणुकीने झाल्याचे आपल्या ध्यानात येते.

काँग्रेसच्या विरोधात अन्य राजकीय पक्षांनी आघाडी करून काँग्रेसविरोधी आघाडीचे जे राजकारण पुढील काळात केले त्याचाही उगम १९६७ सालातील निवडणुकीमध्येच असल्याचे आपल्या ध्यानात येते. 'बडी आघाडी' असे त्या प्रयोगाचे वर्णन तेव्हा केले गेले होते. त्याचेच पुढील पाऊल १९७१ सालातील निवडणुकीमध्ये उचलले गेले. त्यांमुळे, १९६७ आणि काही अंशी १९७१ या दोन निवडणुका कलाटणी देणा-या निवडणुका ठरल्या, असे आता म्हणता येईल अथवा म्हणता येते. आपल्यापैकी काहीजणांना धक्का बसेल कदाचित, परंतु, १९७७ सालातील निवडणूक मात्र कलाटणी देणारी निवडणूक म्हणता येणार नाही. ती निवडणूक नाट्यपूर्ण होती यात वादच नाही. परंतु, तिला 'क्रिटिकल इलेक्शन' म्हणून काही गणता येणार नाही. कारण, कोणत्याही नवीन प्रकारची फेरजुळणी त्या निवडणुकीद्वारे साकारली आणि ती फेरजुळणी पुढे टिकली असे त्या निवडणुकीद्वारे काहीच घडले नाही. या अर्थाने, १९८९ सालातील निवडणूक मात्र कलाटणीपूर्ण होती, असे निश्चितच म्हणता येईल. म्हणजेच, लोकसभेसाठी आपल्या देशात आजवर ज्या १६ निवडणुका झाल्या त्यांतील मोजक्याच - म्हणजे, अवघ्या दोन-चार इतक्यांच काय त्या - निवडणुका ख-या अर्थाने 'क्रिटिकल' या गटात गणता येतील, हाच या सा-या विवेचनाचा इत्यर्थ.

आता, २०१४ सालातील निवडणूक या अर्थाने कलाटणी देणारी आहे, असे राज्यशास्त्राच्या काही अभ्यासकांना अलीकडील काही वर्षांत वाटायला लागलेले आहे. राज्यव्यवहाराच्या अभ्यासकांचे हे मत, अर्थातच, २०१४ सालातील निवडणुकीच्या निकालानंतर बनलेले आहे. काँग्रेसचे सरकार गेले आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार आले, न बोलणारे एक पंतप्रधान सत्तेवरून पायउतार झाले आणि खूप बोलणारे एक पंतप्रधान सत्तेवर आले, एवढेच बदल २०१४ सालच्या निवडणुकीद्वारे घडले, असे आपल्याला नक्कीच म्हणता येणार नाही. हे बदल तर घडलेच, परंतु, याच्याही पलीकडे अधिक काही तरी त्या निवडणुकीद्वारे साकारले. हे 'अधिक काही तरी' म्हणजे नेमके काय, याचा नीट उलगडा होईहोईपर्यंतच २०१९ सालातील निवडणूक आपल्या पुढ्यात येऊन ठेपली.



त्या गेल्या- म्हणजे, २०१४ सालातील - निवडणुकीद्वारे आपल्या व्यवस्थेतील कोणत्या सामाजिक शक्तीची नेमकी फेरजुळणी घडून आली, ती फेरजुळणी जी झाली ती, हिंदू विरुद्ध अ-हिंदू अशी झाली, मध्यमवर्गीय विरुद्ध अन्य वर्गीय अशी झाली की ग्रामीण विरुद्ध शहरी (जिचा परिपाक आपल्या देशातील शेतीक्षेत्रासमोर जो पेचप्रसंग खडा आहे त्यांत कदाचित आपल्याला शोधावा लागेल) अशी झाली, या वास्तवाचे आकलन होईपर्यंतच २०१९ सालातील निवडणूक उंबरठ्यावर येऊन उभी राहिली, अशी आजची परिस्थिती आहे. १९६७ सालातील कलाटणी देणा-या निवडणुकीद्वारे उभरून आलेल्या अनेक प्रक्रिया व घडामोडी १९७१ सालातील निवडणुकीपर्यंत जशा चालू राहिल्या, आणि त्यांमुळे १९७१ च्या निवडणुकीला जसे महत्त्व प्राप्त झाले, अगदी त्याच धर्तीवर, २०१४ सालातील निवडणुकीने ज्या प्रक्रियांना जन्म दिला त्या प्रक्रिया उत्तरोत्तर पक्क्या होत चाललेल्या आपल्याला दिसतात. त्यांमुळे, २०१९ सालातील निवडणुकीचा विचार करत असताना, २०१४ सालच्या निवडणुकीचा संदर्भ मनाशी सतत जागता ठेवणे भाग पडते. २०१४ सालातील निवडणुकीद्वारे साकारलेल्या कोणत्या प्रक्रिया इथून पुढच्या काळात पक्क्या होत राहतील वा त्या निवडणुकीद्वारे निष्पन्न झालेल्या कोणत्या बाबी येत्या काळात पुन्हा पुन्हा येऊन आपल्याला सतत भिडत राहतील, यांचा विचार करणे मग ओघानेच येते.

आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेचा गेल्या तीन दशकांदरम्यानचा - म्हणजेच, १९८४ सालानंतरचा - प्रवास नीट निरखला तर, एका पक्षाला बहुमत मिळून त्या पक्षाचे सरकार सत्तारूढ होणे, हे चित्र २०१४ सालातील निवडणुकीनंतर दिसले. एका पक्षाचे सरकार बहुमत मिळवून केंद्रामध्ये सत्ता स्थापन करू शकते, हे आपल्या देशातील बहुसंख्य जनतेच्या ध्यानात २०१४ सालातील निवडणुकीनंतर आले, हा आपल्या देशातील राजकीय पक्षव्यवस्थेतील एक महत्त्वाचा बदल त्या निवडणुकीद्वारे दिसून आला. १९५० सालापासून आपल्या देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये मध्यवर्ती राहिलेला काँग्रेस पक्ष २०१४ सालातील निवडणुकीनंतर जवळपास संपुष्टात आल्याचे चित्र सामोरे आले, हा झाला त्या निवडणुकीनंतरचा दुसरा महत्त्वाचा बदल.

**पोकळी भरून कोण काढणार ?**

गेल्या पाच वर्षांदरम्यान काँग्रेस पक्षाचे पुरेसे पुनरुज्जीवन झालेले आहे, असे खुद्द काँग्रेस पक्षही म्हणणार नाही. त्यांमुळे, साहजिकच आता असा प्रश्न उभा राहणार आहे की, काँग्रेस पक्षाचे देशाच्या पक्षव्यवस्थेमध्ये आजवर राहिलेले मध्यवर्ती स्थान हरपल्यामुळे जी पोकळी निर्माण झालेली दिसते ती पोकळी आता कोण भरून काढणार, हा. प्रादेशिक पक्ष ती पोकळी भरून काढणार आहेत का, भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व येत्या काळात इतके वाढणार आहे का, की काँग्रेस पक्षाची ती पोकळी आता आपल्याला फारशी जाणवणार नाही...असे काही प्रश्न २०१४ सालातील निवडणुकीमुळे आपल्या देशातील पक्षपद्धतीसंदर्भात आपल्या पुढ्यात ठेपावेत.

तिसरा जो प्रश्न २०१४ सालातील निवडणुकीमुळे आपल्याला येत्या काळात सतत सामोरा येणार आहे तो म्हणजे, भारत एक देश म्हणून आपण जे काही आहोत ते नेमके कोण आहोत आणि काय आहोत, हा. २०१४ सालातील निवडणुकीदरम्यान या प्रश्नाची चर्चा झाली परंतु ती फार थोडी झाली. परंतु, आता आणि या पुढे ती नक्कीच अधिक होईल. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या प्रश्नाची चर्चा थोडे दिवस आपल्या देशात झाली. परंतु, त्या नंतर तो प्रश्न फारशा गांभीर्याने आपल्या चर्चाविश्वात चर्चिला गेला नाही. ''भारत नावाची ही गोष्ट नेमकी काय आहे, हे आता ठरून गेलेले आहे'', असे गृहीत धरले गेले.

परंतु, भारत म्हणजे नेमके काय, भारतीय समाज म्हणजे नेमके काय, हा वादग्रस्त मुद्दा आहे, याची आठवण आपल्याला करून दिली गेली ती २०१४ साली. त्या वेळी ती जाणीव गुपचूप करून दिली गेली, 'सोशल मीडिया'वरून करून दिली गेली, 'व्हॉट्स् ॲप' संदेशांद्वारे करून दिली गेली. परंतु, २०१९ सालातील निवडणूक प्रचारांदरम्यान ती आठवण जाहीर सभांमधून करून दिली जाताना आपण अनुभवली. त्या जाणिवेला एक प्रकारे जणू अधिकृतता प्रदान करण्यासाठी, २०१४ सालानंतरच्या प्रचारादरम्यान आणि उत्तर प्रदेशमध्ये भारतीय जनता पक्षाला विजय प्राप्त झाल्यानंतर, ''आता इथून पुढे नवीन भारत (न्यू इंडिया) घडतो आहे'', अशी द्वाही पंतप्रधानांनी फिरवली.



'नवा भारत' (न्यू इंडिया) या गोष्टीची सैद्धांतिक मांडणी अथवा विवेचन पंतप्रधानांनी केले नाही. किंबहुना, राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्वांकडून तशी अपेक्षाच नसते. ते काम आपले असते. उत्तर प्रदेशमधील निवडणुका झाल्यानंतर दोन लोकसभा निवडणुकांच्या मधल्या टप्प्यावर हा प्रश्न ऐरणीवर आणला गेला. आता, त्यांमुळे आपल्या समोर पेच आहे. तो असा की, मतदान करतेवेळी, अथवा आपल्या देशातील राजकारणाकडे बघताना आपण देशापुढील आर्थिक प्रश्नांकडे जरून बघतो, बघू आणि बघणारही; परंतु, त्याच वेळी, 'नव्या भारता'संदर्भात या निवडणुकीमध्ये तुमची-माझी, आपल्या देशातील राजकीय पक्षांची मते नेमकी काय आहेत, यांकडेही बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्याला कारणही तसेच आहे. प्रत्येक देशाच्या राजकारणामध्ये असा एक टप्पा येत असतो ज्या वेळी, निवडणुका या केवळ सरकार निवडण्यापुरत्या मर्यादित न राहता, 'निवडणुका' नावाची गोष्ट ज्या एका चौकटीमध्ये साकारत असते त्या व्यापक चौकटीशी 'नागरिक' या नात्याने आपला संबंध येत असतो. ती चौकट म्हणजे 'लोकशाही' नावाची गोष्ट.

केवळ निवडणुका म्हणजे लोकशाही नव्हे. परंतु, निवडणुका ज्या होत असतात त्या 'लोकशाही'नामक चौकटीमध्ये होत असतात. मतदार म्हणून अथवा नागरिक म्हणून वावरत असताना 'लोकशाही' नावाच्या त्या व्यापक चौकटीची जाणीव आपल्याला दर वेळी असेतच असे नाही. त्याला कारणे अनेक दिसतात. एक तर आपण आपल्या दैनंदिन व्यवधानांत गुंतलेले असतो. परिणामी, निवडणुकांचे सैद्धांतिकीकरण करण्यात आपल्याला बहुधा स्वारस्य नसते. दुसरे म्हणजे, आपण ब-याच गोष्टी गृहीत धरून चालत असतो. आपण गृहीत धरतो की, आपल्या देशात निवडणुका होतात. आपण गृहीत धरतो की, निवडणुका होतात याचा अर्थ आपल्या देशात राजकीय स्वातंत्र्य आहे. आपल्या देशात राजकीय स्वातंत्र्य आहे याचा अर्थ राजकीय संघटन करण्याचे आपल्या देशात स्वातंत्र्य आहे, असे आपण गृहीत धरलेले असते. संघटना करण्याचे स्वातंत्र्य आहे म्हणजे आपल्या देशात मत मांडण्याचे स्वातंत्र्य आहे, असे गृहीतक आपण मांडतो. स्वातंत्र्याची अशी विशाल कल्पना आपल्या मनात उलगडत गेलेली असते.

**‘लोकशाही’नामक व्यापक चौकट**

निवडणुका हा त्या सगळ्या व्यापक पसा-याचा एक भाग आहे ही जाणीव आपण दर वेळी घोकून दाखवत नसतो. परंतु, ती आपल्या अबोध मनामध्ये जागी असते. परंतु, कोणत्याही देशाच्या राजकारणामध्ये काही टप्पे असे येतात की, ‘लोकशाही’ नावाचा हा जो व्यापक पसारा आहे त्याचे भान आपल्याला त्या टप्प्यावर ठेवावे लागते. भारतामध्ये पहिल्यांदा हे भान निवडणुकीच्या वेळी आपल्याला ठेवावे लागले ते १९७७ साली. निखळ तांत्रिक कारणांपायी जरी १९७७ सालातील निवडणूक ‘क्रिटिकल’ या सदरात दाखल होत नसली तरी, त्या निवडणुकीने हा मोठा मुद्दा लोकांच्या पुढ्यात उभा केला होता. ही निवडणूक आपल्याला केवळ ‘य’ सरकार पाहिजे की ‘क्ष’ सरकार पाहिजे, ‘अ’ नेता पाहिजे की ‘ब’ नेता हवा एवढ्याच पुरती मर्यादित नाही, तर काही तरी ‘अधिक’, काही तरी ‘जास्त’ तिच्यामध्ये आहे, ही जाणीव मनाशी जागती ठेवून त्या निवडणुकीमध्ये मतदार म्हणून आपण भाग घ्यावयाचा असतो, निदान तशी अपेक्षा तरी असते. हे काही तरी ‘अधिक’ जे असते तो म्हणजे आपल्या लोकशाहीचा संदर्भ असतो.

लोकशाहीचा हा संदर्भ ज्या वेळी आपण विसरतो त्या वेळी निवडणुकांकडे आपण सुट्या सुट्या गटांच्या स्वार्थापुरते पाहत राहू. मग तो स्वार्थ जातीचा असेल अथवा भाषेचा असेल अथवा प्रांताचा. निवडणुकांकडे बघताना ही सुटा सुटा विचार करण्याची आपली जी रीत आहे तिच्या पलीकडे जाऊन एक प्रश्न आता आपल्याला विचारावा लागणार आहे. निवडणुकीच्या या खेळामधून जी कोणी व्यक्ती प्रधानमंत्री होणार असेल ती होईल परंतु, आपल्या लोकशाहीचे काय होणार आहे, हा तो प्रश्न. हा प्रश्न उपस्थित करावा लागण्यासही कारणे आहेत. उदाहरणार्थ, आपण १९९०चे दशक पाहू. १९९०चे दशक हे भारतातील लोकशाहीच्या प्रसाराचे (Democratic Upsurge) दशक होय, असे काही अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. साधारणपणे १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धापासूनच्या पुढील कालखंडाचे वर्णन या शब्दसंहतीने केले गेले होते अथवा केले जात होते. तेव्हा असे काय घडले की ज्याच्यामुळे हे विश्लेषण पुढे आले, हे पाहणे रोचक ठरावे.



लोकशाहीचा हा विस्तार अगर प्रसार १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धामध्ये भारतात घडून आला, असे प्रतिपादन काहींनी केले कारण आपल्या समाजातील महिला, अल्पसंख्याक, दलित, गरीब, ग्रामीण जनता यांसारख्या समाजसमूहांचे मतदानाचे प्रमाण त्या काळात वाढलेले दिसले. निवडणुकांदरम्यानच्या एकंदरच मतदानाचे सर्वसाधारण प्रमाण त्या काळात वाढते राहिले असे नाही तर, या समाजसमूहांच्या मतदानाचे प्रमाणही त्या कालखंडात वाढते दिसत राहिले. म्हणूनच, हा लोकशाहीचा विस्तार आहे, असे एका अर्थाने त्या काळात म्हटले गेले.

दुसरे म्हणजे, अनेक नवीन राजकीय पक्ष त्या कालखंडात उदयाला आले. नवनवीन मागण्या ते पक्ष करूलागले. त्यांचे त्यांचे झेंडे घेऊन ते उभे राहिले. निवडणुकांमध्ये जो ‘मेन्यू’ मतदारांना सादर केला जातो त्या sv‘मेन्यू’च्या चौकटीमध्ये त्या सगळ्या प्रक्रियेद्वारे थोडासा बदल घडून आला आणि विस्तारही. परंतु, हा विस्तार केवळ विस्तारच होता हे नंतरच्या कालखंडात अभ्यासकांच्या ध्यानी आले. विस्ताराबरोबरच लोकशाही अधिक खोल बनणे, लोकशाहीची प्रक्रिया अधिक सखोल झिरपणे जे अपेक्षित होते तसे काहीच होत नसल्याचे दृग्गोचर होऊ लागले. साधारणपणे, २०१०-११ सालानंतरच्या अभ्यासांदरम्यान हे वास्तव अभ्यासकांच्या पुढ्यात साकारू लागले. या वस्तुस्थितीची काही उदाहरणे अभ्यसनीय ठरावीत.

साधारणतः २०१० सालानंतरच्या एका अभ्यासादरम्यान लोकांना एक प्रश्न विचारण्यात आला. ‘तुम्हांला लोकशाही मान्य आहे का ?’, हा तो प्रश्न. अभ्यासकांचा अनुभव असे सांगतो की, साधारणपणे या प्रश्नाला कोणीही नकारात्मक प्रतिसाद देत नाही. ९० टक्क्यांपेक्षा अधिक प्रतिसादकांनी, ‘हो ! आमचा लोकशाहीला पाठिंबा आहे’, असेच त्या प्रश्नाचे उत्तर दिले. परंतु, लोकशाहीला असलेल्या या पाठिंब्याचा पापुद्रा खरवडत जसजसे आपण पुढील प्रश्न विचारू लागतो त्या वेळी, ठाम लोकशाहीवाद्यांचे आपल्या देशाच्या विविध भागांतील प्रमाण ३० ते ४० टक्के इतकेच असल्याचे आपल्या ध्यानात येते. बिगर लोकशाही पर्याय ज्यांना कधीही कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही, अशांचे प्रमाण एकूणांत कमीच असते, या वास्तवाचा आपल्याला मग साक्षात्कार घडतो.

**लोकशाहीचा स्वीकार वरवरचा ?**

'लोकशाही राज्यप्रणाली चांगली आहे', असा प्रतिसाद देणा-यांना, 'सैन्याची सत्ता असावी का ?', असा प्रश्न विचारला तर, 'कधी कधी चालेल', असे उत्तर येते. 'तज्ज्ञांवर सगळ्या गोष्टी सोपवाव्यात का ?', असा प्रश्न विचारला तर, 'अर्थातच, नेहमी चालतील', असा लोकांचा प्रतिसाद असतो. 'निवडणुकांची भानगड ज्याला गळ्यामध्ये घ्यावी लागणार नाही, असा बलवान नेता चालेल का ?', या प्रश्नाला अनेक लोकांनी 'चालेल' किंवा 'हवा', असा प्रतिसाद दिला. साधारणतः २०१०-११ सालाच्या आगेमागे केलेल्या अभ्यासांदरम्यान प्रतिसादकांनी दिलेल्या उत्तरांचे रूप-स्वरूप हे असे होते अथवा असे दिसते. हे अभ्यास निवडणुकांच्या आगेमागे केलेले नव्हते, ही बाब इथे अधोरेखित करावयास हवी. 'लोकशाही' नावाची जी गोष्ट आपल्या देशामध्ये नागरिकांनी स्वीकारली आहे, असे आपण म्हणतो तो स्वीकार, काही अंशी तरी, असा वरवरचा असावा असे हे अभ्यास सांगतात. तो सर्वांशाने वरवरचा नसेलही कदाचित, परंतु, तो अगदी ठाम आणि सघन आहे, असेही ठोकपणे म्हणता येत नाही. लोकांच्या अधिकारांना ज्या वेळी खरोखरच नख लागते त्या वेळी लोक कसा प्रतिसाद देतात ते आपण १९७७ साली बघितले. परंतु, इतर वेळी मात्र आपण कट्टर लोकशाहीवादी नसतो. ज्या वेळी माझ्या जातीच्या अथवा धर्माच्या अधिकारांचा प्रश्न येतो त्या वेळी मी लोकशाहीवादी असतो. परंतु, तुमच्या जातीच्या अथवा तुमच्या धर्माच्या अधिकारांचा प्रश्न येतो त्या वेळी मी लोकशाहीवादी असतोच असे  नाही. ती जोखीम माझी नसते.

लोकशाही पलीकडेही लोकांच्या काही अधिक जिव्हाळ्याच्या, प्रेमाच्या बाबी आहेत वा असतात आणि त्या गोष्टींच्या आड लोकशाही येत असेल तर लोकशाहीबद्दलचे लोकांचे प्रेम ओसरते, असे अलीकडील तीन वर्षांच्या काळात - म्हणजे, २०१५ ते २०१८ या काळात - जे काही अभ्यास झाले त्यांचे निष्कर्ष सांगतात. आपल्या धर्माच्या रिवाजांप्रमाणे अन्य धर्मांच्याही लोकांनी वागायला हवे, असा लोकांचा आग्रह दिसतो. आणि इतर धर्मांचे लोक माझ्या धर्माच्या रिवाजांना मान्यता देत नसतील तर तसे वागण्यास त्यांना कायद्याने भाग पाडले पाहिजे, हे लोकांना चालते.



कायदा हातात घेतला जाऊ नये, असे आपण म्हणतो त्या वेळी कायदा हातात घेणे हा केवळ एक भाग झाला. परंतु, मुळात कायदा कसा असावा, यांबाबत लोकांची कल्पना काय आहे, हे आपण जेव्हा पाहतो तेव्हा आपल्याला असे चित्र दिसते की ती कल्पना वरवरची किंवा एका मर्यादित अथवा संकुचित लोकशाहीवादी स्वरूपाचे असते. त्याच्या पलीकडे जाऊ न ज्या वेळी, लोकशाही आणि माझा धर्म, लोकशाही आणि माझी जात यांत द्वैत निर्माण होऊ लागते त्या वेळी आपल्या मनामध्ये चलबिचल होते. मग आपल्याला असे वाटायला लागते की नाही, या गोष्टी लोकशाहीपेक्षा अधिक महत्त्वाच्या आहेत. एकूणच, मोठ्या आवाजात बोलणे आणि मोठ्या संख्येच्या आधारे इतरांना गप्प बसविणे हा लोकशाहीचा रास्त अर्थ आहे, यात काही चुकीचे नाही, असेच बहुसंख्य लोकांना वाटत असते. बहुसंख्य लोकांचे एखादे मत असेल तर ते बाकीच्यांनी मान्य केले पाहिजे, असा लोकांचा आग्रह असतो. बहुसंख्य लोकांच्या मतानुसार सरकार चालावे, हा कार्यपद्धतीचा भाग झाला. ते 'प्रोसिजर' आहे. ज्या पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष सरकार बनवतो व ते सरकार कारभार करू लागते, ही पद्धत आपण स्वीकारलेली आहे. परंतु, त्याच्या पलीकडे जाऊन दर वेळेला जिथे जो बहुसंख्य, बहुमतातील असेल तो पक्ष, तो धर्म, ती जात, ती जमात, तो प्रदेश वरचढच असले पाहिजेत ही लोकशाहीची सर्वसाधारणपणे आपली समजूत तयार झालेली आहे. ही समजूत एकदम तयार होत नसते. केवळ एक व्यक्ती पंतप्रधानपदी आली म्हणून ती तयार होत नसते, केवळ एखादा पक्ष सत्तेवर आला म्हणून ती साकारत नसते तर ती काळाच्या ओघात तयार झालेली समजूत असते. आपले पक्षीय राजकारणही याच समजुतीमधून साकारत असते, हेही लक्षात ठेवावयास हवे. नेमके कोणते प्रश्न निवडणुकीनंतर आपल्या पुढ्यात येणार आहेत, आणि ही निवडणूक महत्त्वाची आहे असे नंतर म्हणून उपयोगाचे नाही तर आताच ती महत्वाची आहे हे का लक्षात ठेवायला पाहिजे, त्याचे सूचन घडविण्यासाठी या मुद्यांचा उहापोह गरजेचा ठरतो. गंमतीचा भाग म्हणजे या सगळ्यांतील काहीच निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आपल्या पुढ्यात येत नाही, दिसत नाही अथवा मांडले जात नाही.

**सगळी चलाखी 'इश्यू फ्रेमिंग'दरम्यान !**

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आर्थिक प्रश्नांचा निर्देश होतच नाही, असेही नाही. आर्थिक मुद्दे चर्चेमध्ये आणले जातात परंतु त्यांचा उल्लेख बरेचदा संदर्भहीन पद्धतीने आणि परस्परांवर केवळ कुरघोडी करण्यापुरताच केला जातो. त्यांमुळे, आपण ज्या मुद्यांची चर्चा करतो आहोत ते मुद्दे अथवा प्रश्न आणि त्यांची व्यापक अशी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक चौकट यांच्यापासून आपले राजकारण व राजकारणातील स्पर्धा कशी कोरडी, अलग व अलिप्त राहील याचीच ठाम दक्षता राजकीय व्यवस्थेकडून घेतली जाते. राज्यशास्त्राच्या तांत्रिक परिभाषेमध्ये यास 'इश्यू फ्रेमिंग' असे म्हटले जाते. निवडणुकीदरम्यान कोणते मुद्दे चर्चाविश्वात असतील ते नागरिक अथवा आपण नाही ठरवू शकत. ते दुसरेच कोणी तरी ठरवत असते. सर्वसाधारणपणे, राजकीय पक्ष व माध्यमे ते ठरवत असतात आणि मग त्या पद्धतीने ते 'इश्यू' आपल्या पुढे मांडले जातात. त्या पद्धतीने ते मुद्दे तसे मांडले गेले की, "अरे ! ज्या अर्थी हे विषय मांडले जात आहेत त्या अर्थी या मुद्यांचा विचार आपण केला पाहिजे", असे आपल्यालाही मग वाटायला लागते. रोजची वर्तमानपत्रे वाचली अथवा दूरचित्रवाणीच्या अनंत वाहिन्यांवर निवडणुकांच्या काळात तावातावाने झडणा-या रोजच्या चर्चा नुसत्या बघितल्या अथवा ऐकल्या तरी, आपण या ठिकाणी ज्या संबंधात चर्चा करतो आहोत त्यांपेक्षा फार वेगळ्या गोष्टी तिथे मांडल्या जातात, असे आपल्या ध्यानात येते.

आता, 'इश्यू फ्रेमिंग'च्या अर्थाने विचार केला तर कोणते प्रश्न आपल्याकडे चर्चिले जाताना दिसतात, हे पाहणे मोठेच रोचक व उद्‌बोधक ठरेल. ढोबळ मानाने बघितले तर असे दिसते की, 'इश्यू फ्रेमिंग'ची एका पक्षाची सुरुवात होते ती, 'देश बळकट करण्या'पासून. "देश बळकट केला पाहिजे आणि ते करायचे तर सरकार बळकट पाहिजे...सरकार बळकट असायला हवे तर त्यासाठी नेता बळकट असला पाहिजे..."...असे ते तर्कशास्त्र मग पद्धतशीरपणे उलगडत जाते. म्हणजे, 'मजबूत सरकार' हे 'इश्यू फ्रेमिंग' या ठिकाणी झाले. 'मजबूत सरकार'ची घोषणा या 'इश्यू'च्या चौकटीमध्ये आपल्याला येताना दिसते.



या उलट, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, ओडिशा या राज्यांतील प्रचार ऐकला-पाहिला तर असे दिसते की, राज्याचा विकास, विकासासाठी राज्याला वित्तीय अथवा आर्थिक 'पॅकेज', राज्याची अस्मिता, राज्याची भाषा, राज्याचे प्रश्न या वर्तुळांत तिथे 'इश्यू फ्रेमिंग' झालेले अथवा होताना दिसते. आंध्र प्रदेश, तेलंगणा यांसारख्या राज्यांतील प्रादेशिक पक्ष बघितले तर आपल्या लक्षात येते ते असे की व्यापक, राष्ट्रपातळीवरील प्रश्न त्यांना कळत नाहीत, त्यांना ते नको असतात असेही नाही. परंतु, त्यांची 'इश्यू फ्रेमिंग'ची पद्धत अशी आहे की ज्यांत स्थानिक लोकांना केवळ त्यांच्या त्यांच्या राज्यापुरताच विचार करण्यास प्रवृत्त केले जाईल. 'सुजाण नागरिक' या नात्याने आपल्या राज्यातील प्रश्नांच्या पलीकडे जाऊ न लोकांनी व्यापक स्तरावर विचार करावा, अशी राजकीय पक्षांची तिथे अपेक्षा नसते. आपल्या देशाच्या पूर्वेपासून ते दक्षिणेपर्यंत राज्यांचा एक पट्टा या प्रकारच्या 'इश्यू फ्रेमिंग'च्या विळख्यामध्ये सापडलेला दिसतो.

समाजवादी पक्ष आणि बहुजन समाजवादी पक्ष या उत्तर प्रदेशातील दोन प्रतिस्पर्धी 'इश्यू फ्रेमिंग' कसे करतात ते बघितले तर आपल्या लक्षात असे येते की, कोणत्याही ठाम मुद्यांना भिडण्याऐवजी काही ठरावीत व्यक्तिमत्वांभोवतीच निवडणूक सीमित ठेवणे ही त्यांची गरज दिसते. एका बाजूला अखिलेशसिंह व मुलायमसिंह आणि दुस-या बाजूला मायावती हे नेते व त्यांच्याशी भावनिक गुंफण असलेले ते ते समाज या परिघापलीकडे निवडणुकीची चर्चा विस्तारू देणे त्या दोन्ही पक्षांना परवडणारे नसते. राहता राहिला काँग्रेस पक्ष. या पक्षाच्या न्याय या योजनेबाबत बरेच चर्वित्चर्वण घडते आहे. परंतु, न्याय नावाच्या या योजनेबद्दल बोलत असताना ही कल्पना व्यवहारात उतरवण्याचे मार्ग कोणते, त्यांमुळे अर्थव्यवस्थेवर काय व्यापक परिणाम होतील, या योजनेमुळे अर्थव्यवस्थेला खरोखरच इंजिन लाभेल की केवळ तात्पुरता धक्का मिळेल, याची चर्चा करावीशी त्या पक्षाला वाटत नाही. दुसरीकडे, भारत नावाचे हे राष्ट्र नेमके कोणाचे आहे, या प्रश्नालाही ठामपणे भिडण्यास काँग्रेस अनुत्सुक दिसते. म्हणजे, एकंदरीनेच कळीच्या मुद्यांपासून पळ काढण्याचा त्या पक्षाचा पवित्रा दिसतो.

## राजकारण दोन बाबतींत अपयशी

म्हणजेच, या देशाच्या जनतेपुढे असलेले आर्थिक प्रश्न किंवा या देशातील लोकशाहीच्या पुढ्यात असणारे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाचे इथून पुढच्या काळात महत्त्वाचे ठरणारे प्रश्न यांना थेट न भिडणारी अथवा भिडलीच तर ते प्रश्न विपर्यस्त स्वरूपात तुमच्या-आमच्या पुढे मांडणारी अशी प्रचाराची एक चौकट राजकीय पक्ष आपल्या पुढ्यात ठेवत असतात. आजच्या राजकारणाची पातळी अतिशय खालावलेली आहे, राजकारणाची भाषा आताशा फार निकृष्ट बनलेली आहे, अशा प्रकारची हळहळ विशेषतः शहरी मध्यमवर्गाकडून जी व्यक्त होते तिचे मूळ नेमक्या याच वास्तवात दडलेले आहे. परंतु, राजकारणाची भाषा गैर बनणे, राजकारणाची पातळी खालावणे ही वस्तुतः केवळ बाह्य लक्षणे आहेत, ही बाब आपल्या ध्यानात येत नाही. कशा प्रकारच्या 'इश्यूज्'ची चर्चा राजकीय पक्ष करू इच्छितात आणि मतदार म्हणून आपण कोणत्या मुद्यांना प्रतिसाद देऊ इच्छितो, हा मूळ रोग अथवा प्रश्न आहे, ही बाब आपण नीट समजावून घ्यावयास हवी. इथे प्रश्न केवळ राजकीय प्रचाराच्या भाषेचा नाही. प्रश्न केवळ राजकीय संस्कृतीचाही नाही. आपल्या देशातील पक्षीय राजकारण दोन बाबींमध्ये अपयशी ठरलेले आहे, हा मुख्य प्रश्न होय. ज्याला आपण सामूहिक हित म्हणतो ते सामूहिक हित जपणे हे राजकारणाचे काम असते अथवा राजकारणाकडून ती अपेक्षा असते. आपल्या देशातील राजकीय पक्षांनी ते केलेले नाही. दुसरे म्हणजे, आपला सामाजिक विवेक बळकट करण्याचे कामही आपल्या व्यवस्थेतील राजकारणाने साधलेले नाही. उलट, हा सार्वजनिक विवेक किती दुबळा बनेल, किती क्षीण बनेल हेच आपल्या राजकारणाने बघितले. या दोन मर्यादांमध्ये आपल्या देशातील राजकारण व निवडणुकांची चौकट सध्या घडताना दिसते.

त्यामुळे, २०१४ आणि २०१९ या दोन सालांतील निवडणुका सलगपणे बघितल्या तर असे दिसते की, एका पक्षाचे सरकार नको म्हणून दुस-या पक्षाला मतदारांनी कौल दिला, इतकी साधी चौकट २०१४ सालातील निवडणुकीला लाभली होती. परंतु, निवडणुकीनंतर सत्तारूढ झालेल्या राजकर्त्या पक्षाने मात्र त्या निवडणुकीचा अर्थ खूप मोठा लावला.



आम्हांला अमूक एक पाच-चार गोष्टी करण्यासाठी हा जनादेश मिळालेला आहे आणि म्हणून त्या गोष्टी आम्ही करणार, असा त्या निवडणुकीतील विजयाचा अर्थ सत्तारूढ सरकारने लावला आणि तिथून आपल्या देशातील राजकारणाला एक कलाटणी मिळाली. त्यामुळेच, एरवी साधी-सरळ ठरणारी २०१४ सालातील निवडणूक ऐतिहासिक महत्त्वाची शाबीत झाली. एका पक्षाचे सरकार जाऊन दुस-या पक्षाचे सरकार आले, एवढीच केवळ एक गोष्ट त्या निवडणुकीने घडली नाही. तर, सत्तारूढ झालेल्या त्या पक्षाने तुमच्या-माझ्या मनात स्वतःचे वैचारिक प्रभुत्व निर्माण केले. तुम्ही-आम्ही कशा प्रकारे विचार करणार यांवर त्या पक्षाने त्याची पकड प्रस्थापित केली, हे ते वैचारिक प्रभुत्व होय. यात तो पक्ष काही अंशी यशस्वी झाला, असा गेल्या पाच वर्षांचा आपला अनुभव आहे. त्या तुलनेत पाहिले तर, २०१९ सालातील निवडणूक बरोबर उलट्या स्वरूपाची आहे. आणि, तोच या निवडणुकीचा अथवा निवडणुकीतील खरा विरोधाभास होय. वस्तुतः ही निवडणूक अशा स्वरूपाची आहे की, जिच्यात मतदारांनी आपण कोणाला मत का व कशासाठी देतो आहोत याचा सखोल विचार करून मतदान करण्याची निकड आहे. सत्तेवर असलेले सरकार बदलणे अथवा सरकारच्या आजवरच्या कामगिरीचे मूल्यमापन करून मतदान करण्याच्याही पलीकडे जाऊन अनेक बाबींचा विचार करत मतदान केले जाणे या निवडणुकीमध्ये अगत्याचे ठरते. परंतु, निवडणुकीदरम्यानच्या प्रचाराचा सारा भर वा रोख बघितला तर, लोक नेहेमीच्या - म्हणजेच, जात, धर्म, महागाई, रोजच्या जीवनातील कष्टप्रदता - यांसारख्या मुद्यांचा विचार करूनच मतदान करतील, असा सारा रंग दिसतो.

भारतातील निवडणुकांमधील हा विरोधाभास नीट समजावून घेण्याचा विषय आहे. ज्या वेळी लोकांनी साधे-सरळ मतदान केले त्या वेळी राज्यकर्त्यांनी त्यांतून मोठा अर्थ काढला आणि आता ज्या वेळी खरोखरच मोठ्या अर्थाचे, व्यापक प्रश्न तुमच्या-आमच्या पुढ्यात आहेत त्या वेळी सर्वसाधारण मुद्यांच्या आधारेच मतदान केले जाण्याची चिन्हे दिसतात. आपण भारतीय आहोत म्हणजे नेमके काय व कोण आहोत, भारत म्हणजे नेमके काय, हे आपल्या पुढ्यातील सर्वांत कळीचे प्रश्न होत. ***(कृपया पृष्ठ २९ पाहावे)***

सामाजिक

# वास्तव वृद्धाश्रमांचे

एकत्र कुटुंबपद्धतीकडून संयुक्त कुटुंबपद्धतीकडे होत असलेले कुटुंबव्यवस्थेचे स्थित्यंतर हे आपल्या बदललेल्या जीवनशैलीचे एक परिमाण होय. या नव्या बदलाचा सर्वाधिक फटका जर कुणाला बसत असेल तर तो कुटुंबातील ज्येष्ठांना. छोट्या होत चाललेल्या कुटुंबातील मनेही तितकीच संकुचित होत चालली आहेत की काय, असा प्रश्न पडावा अशी सध्याची परिस्थिती आहे. आपल्याच कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींचा सांभाळ करायला मुले तयार नसतात. काही वेळेस मुले परदेशांत असल्याने कुटुंबातील वयोवृद्धांची काळजी घ्यायला इथे कुणी नसते अथवा मुले जबाबदारी झटकून परागंदा झालेली असतात. कारणे काहीही असोत परंतु, भारतामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा हक्काचा निवारा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे हे वास्तव नाकारता येत नाही. शहरांमध्ये झपाट्याने वाढणारी आणि ज्येष्ठांनी भरून वाहणारी वृद्धाश्रमे हा बदलत्या सामाजिक वास्तवाचा आरसा ठरतो.

ज्येष्ठांची लोकसंख्या लक्षात घेतली तर भारताचा क्रमांक जगात दुसरा लागतो. ज्येष्ठांची ही संख्या प्रतिवर्षी सातत्याने वाढतच जाणार आहे. एकूण लोकसंख्येतील ज्येष्ठांचा वाटा १९६१ साली ५.६ टक्के इतका होता. तो वाढून २०११ मध्ये आठ टक्के इतका झाला आहे. २०५० साल उजाडेपर्यंत हा वाटा २० टक्क्यांवर पोहोचलेला असेल, असा अंदाज ज्येष्ठांसाठी कार्यरत असलेल्या 'हेल्पएज' या राष्ट्रीय स्तरावरच्या स्वयंसेवी संस्थेने वर्तवलेला आहे. याचाच अर्थ असा आहे की, उत्तम आरोग्यसुविधा, आजारांचे लवकर होणारे निदान, नवनवीन औषधांची उपलब्धता आणि तत्परतेने मिळणारी आरोग्यसेवा यामुळे ज्येष्ठांचे आयुर्मान निश्चितपणे वाढणार आहे. त्यामुळे आगामी काळात तरु णांच्या बरोबरीने ज्येष्ठांचीही संख्या वाढलेली असेल असा अंदाज आहे. याचाच अपरिहार्य परिपाक म्हणून देशात वृद्धाश्रमांचीही संख्या वाढत जाणार आहे.

आपल्या देशात २००१ साली घेण्यात आलेल्या जनगणनेतील उपलब्ध आकडेवारीनुसार, दिल्लीमधील एकूण लोकसंख्येपैकी ५.२ टक्के लोक हे ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणारे आहेत. २००१ सालच्या जनगणनेनुसार सात लाखांच्या घरात



असणारी वयोवृद्धांची संख्या २०११ सालापर्यंत सुमारे ८ लाख ७१ हजारांपर्यंत उंचावली. याचा अर्थ २००१ ते २०११ या दशकभरात ज्येष्ठ नागरिकांची संख्या सुमारे दीड लाखांनी वाढली आहे. २०२१ सालच्या जनगणनेपर्यंत ज्येष्ठांची लोकसंख्या १० लाखांपर्यंत जाईल असा अंदाज आहे. सामाजिक, आर्थिक आणि वैयक्तिक अशा तिन्ही बाबींमुळे ज्येष्ठांना वृद्धाश्रमामध्ये राहण्याची वेळ येते, असे हा अभ्यास सांगतो. आधुनिक जीवनशैलीतील बदलांमुळे जशा काही चांगल्या गोष्टी घडल्या आहेत त्याचप्रमाणे काही वाईट गोष्टीही घडत आहेत. आधुनिक बदलांशी आणि तिचे अपत्य असणा-या आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेत असताना ज्येष्ठांची कसरत होत असते. त्यामुळेच ब-याचदा तरु ण पिढीबरोबरच्या संवादात आणि नातेसंबंधांत अंतर पडत जाते. त्यामुळेच मग विविध कारणांनी घरातील ज्येष्ठ व्यक्ती नकोशी होते आणि तिची रवानगी वृद्धाश्रमामध्ये होते. घरात सांभाळायला कुणीही नसणे, मुलांचा आधार नसणे, मुले परदेशात असणे अशा नाना कारणांमुळे एकाकी, आधारहीन झालेल्या वृद्ध व्यक्ती वृद्धाश्रमाचा आधार शोधतात आणि इतर वृद्धांसमवेत आपले उर्वरित आयुष्य कंठतात. त्यांचा दिनक्रम, आजारपण, औषधे, जेवणखाण आणि विश्रांती या सगळ्याची काळजी वृद्धाश्रमांत घेतली जाते. बदलत्या सामाजिक परिस्थितीमुळे प्रामुख्याने शहरी भागांमध्ये वृद्धाश्रमांची संख्या वाढते आहे. शासकीय स्तरावरील वृद्धाश्रमांपेक्षा खासगी स्तरावर चालवले जाणारे वृद्धाश्रम देशभरात अधिक संख्येने आहेत. भारतातील जनगणनेच्या प्रक्रियेनुसार ६० किंवा त्यापेक्षा अधिक वय असणा-या लोकांना वृद्ध समजले जाते. १९६१ सालच्या जनगणनेनुसार, दोन कोटी ४० लाख वृद्ध भारतात होते. त्यापैकी २ कोटींहून अधिक ग्रामीण भागांत तर ३० लाखांहून अधिक शहरी भागात राहत होते. २००१ साली सात कोटी ६० लाख इतकी वयोवृद्धांची लोकसंख्या होती. या प्रत्येक दशकांत शहरांत राहणा-या ज्येष्ठांचीही संख्या वाढत गेल्याचे दिसते. २०११ च्या जनगणनेनुसार १० कोटी ३० लाख ज्येष्ठ नागरिक भारतात राहत आहेत. त्यापैकी सात कोटी ३० लाख ग्रामीण भारतात व उर्वरित ३ कोटींहून अधिक वयोवृद्ध शहरांमध्ये राहतात. साधारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे, २०१६ साली 'एजवेल फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने देशभरातील ज्येष्ठांच्या सद्य:स्थितीवर प्रकाश टाकणारे एक सर्वेक्षण केले होते. देशातील ३२३ जिल्ह्यांतील वृद्धांच्या परिस्थितीचा आढावा त्यात घेण्यात आला होता. त्यानुसार, एकूण ज्येष्ठ नागरिकांच्या लोकसंख्येपैकी साधारण ६५ टक्के वृद्धांची आर्थिक परिस्थिती ही बेतासबात आहे ही बाब अधोरेखित झाली. वृद्धाश्रमांत राहणा-या

बहुतांश ज्येष्ठांना त्यांच्या हक्कांचीही जाणीव नसल्याने अनेकदा त्यांना विविध प्रकारच्या त्रासांना सामोरे जावे लागते असेही वास्तव या अभ्यासातून समोर आले होते. वृद्धाश्रमात पुरेसा आहार न मिळणे, मारहाण होणे, अवमानित केले जाणे, योग्य वेळी आवश्यक ते औषधोपचार न मिळणे तसेच नातेवाईक, मित्रपरिवार यांना भेटू न देणे, अपंगत्व असल्यास साखळदंड अथवा दोरीने बांधून ठेवणे, वृद्धाश्रमातील कष्टाची कामे करण्याची जबरदस्ती करणे, दररोजच्या किमान गरजांच्या पूर्ततेकडेही दुर्लक्ष करणे, वृद्धांजवळील मौल्यवान वस्तू, कागदपत्रे, पैसे जबरदस्तीने घेणे असे प्रकार ठिकठिकाणी होत असल्याचे धक्कादायक वास्तव या अहवालातून समोर आले होते. वृद्धाश्रमात राहण्यासाठी गेल्यानंतर सामाजिक जीवनापासून संपूर्णतः तुटलेल्या झालेल्या ज्येष्ठांचे प्रमाण २० टक्के इतके असावे. तर, अवमानित पद्धतीने व मानसिक अत्याचार सहन करत जीवन जगावे लागणा-या ज्येष्ठांची संख्या १३ टक्के इतकी असावी असा या अभ्यासांचा कयास आहे.

या वृद्धाश्रमांमधील वास्तव असते तरी कसे, तिथे निवा-याला आलेल्या ज्येष्ठांच्या सर्वसाधारण कल्याणाची पातळी कशी असते, यांसारखे प्रश्न त्यामुळे आता अधिक संवेदनशील ठरतात. भारताची राजधानी असलेल्या दिल्लीमधील वृद्धाश्रमांच्या सद्यःस्थितीचे सर्वेक्षण करून अलीकडेच त्यावर टाकण्यात आलेला प्रकाश त्यादृष्टीने उद्‌बोधक ठरतो. ज्येष्ठांच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता त्यांना पुरेसे पाठबळ देण्यात दिल्लीची प्रशासनव्यवस्था पुरेशी ठरते आहे का, याचा तुलनात्मक अभ्यास या सर्वेक्षणाद्वारे करण्यात आला आहे. दिल्ली विद्यापीठ आणि दिल्लीतील 'हेल्पएज इंडिया' या स्वयंसेवी संस्थेच्या वतीने हे सर्वेक्षण करण्यात आले आहे. अर्थशास्त्राच्या अभ्यासिका व प्राध्यापक इंदू चौधरी यांनी पुढाकार घेऊन हे सर्वेक्षण त्यांच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने पूर्ण केले. ज्येष्ठांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे विश्लेषण करणा-या या अभ्यासाद्वारे नागरी भागांध्ये असणा-या वृद्धाश्रमांच्या सद्यःस्थितीवर प्रकाश पडण्यास मदत व्हावी. दिल्लीतील वृद्धाश्रमांमध्ये राहणा-या ज्येष्ठांच्या परिस्थितीचा अभ्यास करताना तिथे कार्यरत असणारे वृद्धाश्रम कोणकोणत्या भागांत आहेत, तेथील ज्येष्ठांचा प्रामुख्याने आर्थिक स्तर कोणता आहे, ज्येष्ठांमधील स्त्री-पुरुष प्रमाण कसे आहे आणि ही वृद्धाश्रमे कोणाच्या माध्यमातून चालवली जात आहेत, शासकीय पाठबळ किती चांगले आहे या सर्व बाबींचा या सर्वेक्षणात तौलनिक अभ्यास केलेला आढळतो. सद्यःस्थितीत शहरी भागांमधील वृद्धाश्रमांची परिस्थिती



काय आहे, तिथे उपलब्ध असणा-या सोयी-सुविधा आणि सेवा कशा आहेत, तेथील उपलब्ध आरोग्यसुविधांचा दर्जा कसा आहे, समाजातील या एका महत्त्वाच्या घटकाबाबत शासनव्यवस्था किती सजग आहे, अशांसारख्या बाबी या पाहणीच्या निमित्ताने समोर आल्या आहेत. या वास्तवाचा धांडोळा घेतल्यामुळे वृद्धाश्रमांच्या अधिक चांगल्या नियोजनाची आणि प्रत्यक्ष कार्यवाहीची गरज आहे का, असल्यास कोणकोणत्या पातळ्यांवर व कोणत्या दिशेने काम करणे गरजेचे आहे अशांसारख्या पैलूंच्या अधिक सखोल अभ्यासाची दिशा स्पष्ट होण्यास मदत होते आहे. त्याचप्रमाणे, दिल्लीतील एक प्रातिनिधिक चित्र समोर आल्यानंतर त्यातून ज्येष्ठांच्याबाबतीत काळजी घेण्यासाठी वेगाने नागरीकरण होणा-या भागांत कोणती आवश्यक पावले उचलणे गरजेचे आहे हे देखील स्पष्ट होऊ शकणार आहे.

देशाची राजधानी असलेल्या दिल्लीमध्ये वृद्धाश्रमांची सद्यःस्थिती काय आहे आणि कोणकोणत्या पातळीवर सुधारणा होणे आवश्यक आहे यावर झालेला अभ्यासही ज्येष्ठांची सद्यःस्थिती काय आहे हे दर्शवतो. या अभ्यासांतर्गत दिल्लीमधील एकूण २४ वृद्धाश्रमांची निवड करण्यात आली. तिथे राहणारे वृद्ध आणि वृद्धाश्रमांचे संचालक यांच्याशी संवाद साधून परिस्थिती जाणून घेण्यात आली. वृद्धाश्रमांत राहणा-या ज्येष्ठ नागरिकांना प्रामुख्याने त्यांचे राहणीमान, सामाजिक-आर्थिक स्थिती, वैद्यकीय सुविधा, मानसिक समाधान या अंगाने प्रश्न विचारण्यात आले. तर, वृद्धाश्रमातील एकूण क्षमता, तेथील सद्यःस्थिती, वृद्धाश्रमात प्रवेश देण्याची पद्धत, तेथील सुविधा, बाहेरून मिळणारी आर्थिक मदत, येणा-या अडचणी या अनुषंगाने वृद्धाश्रम संचालकांना प्रश्न विचारण्यात आले.

खासगी आणि सार्वजनिक अशा दोन प्रकारचे वृद्धाश्रम दिल्लीत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे त्यातील काही संपूर्ण अनुदानित तत्वावर चालणारे आहेत, काही अंशतः अनुदानावर तर काही संपूर्णतः खासगी तत्त्वावर पैसे आकारून वृद्धाश्रमात राहण्याची परवानगी देणारे असे आहेत. आजमितीस, दिल्लीमध्ये शासनाच्या माध्यमातून पाच वृद्धाश्रम चालवले जातात तर खासगी तत्त्वावर शहरात १९ वृद्धाश्रम सुरू आहेत. निराधार झालेल्या वृद्धांची काळजी घेण्याची प्राथमिक जबाबदारी शासनाची आहे, या भावनेला जागत शहरात शासनस्तरावरचा पहिलावहिला वृद्धाश्रम प्रथम सुरू करण्यात आला. मात्र, शहरात आणखी वृद्धाश्रमांची गरज आहे हे लक्षात येऊन त्या दृष्टीने कृती करण्यासाठी शासनाला पुष्कळ काळ जावा लागला. पहिल्या वृद्धाश्रमाच्या

स्थापनेनंतर साधारणतः २० वर्षांनी दुसरा वृद्धाश्रम शहरात सुरू झाला. त्या नंतर पुढील आठ वर्षांत तीन नवे वृद्धाश्रम शासनाने सुरू केले. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तेथील ख्रिश्चन मिशनरी आणि आर्य समाज मंदिर ट्रस्ट या सारख्या खासगी धार्मिक संस्थांनीदेखील पुढाकार घेऊन दिल्लीमध्ये वृद्धाश्रम सुरू केले आहेत. दिल्लीमध्ये गेल्या दोन दशकांत वृद्धाश्रमांची संख्या लक्षणीय वेगाने वाढली आहे. दिल्लीतील निम्म्याहून अधिक वृद्धाश्रम हे २००० सालानंतर सुरू झालेले आहेत. बदलत्या सामाजिक परिस्थितीची पावले ओळखून त्यातून एक नवा व्यवसाय उभा राहू शकेल अशा व्यावहारिक भूमिकेतून हे वृद्धाश्रम सुरू करण्यात आले आहेत. एकावेळी ५० ते १५० वृद्ध राहू शकतील असे वृद्धाश्रम आजमितीला दिल्लीमध्ये कार्यरत आहेत.

मुले परदेशात असणे किंवा घरात फक्त मुलगी असल्याने तिच्या लग्नानंतर घरातील आई अथवा वडिलांचा सांभाळ कोण करणार अशी परिस्थिती उद्‌भवल्यामुळे वृद्धाश्रमांत यावे लागलेल्या ज्येष्ठांची संख्या मोठी आहे. पूर्वीपासून कुठल्या ना कुठल्या व्याधीने त्रस्त असलेल्या ज्येष्ठांची संख्या सर्वाधिक आहे. दिल्लीच्या पूर्व भागामध्ये भागामध्ये अजूनही एकत्र कुटुंबपद्धती नांदत असल्याचे प्राधान्याने दिसून येत असल्याने या भागात एकही वृद्धाश्रम नाही. उर्वरित सर्व दिल्लीमध्ये नागरीकरण वेगाने झालेले असल्याने वृद्धाश्रमांची संख्या अधिक आहे. दिल्लीमध्ये पुरुष अथवा स्त्रियांसाठी स्वतंत्र असे केवळ तीन वृद्धाश्रम आहेत. बाकी सर्व ठिकाणी वयोवृद्ध स्त्री-पुरुष एकत्रित राहतात. खासगी वृद्धाश्रमांत राहणारे बहुतांश ज्येष्ठ नागरिक हे मध्यम आणि उच्च मध्यम वर्गातील आहेत. निम्न आर्थिक स्तरांतील ज्येष्ठांना सामावून घेऊ शकतील असे केवळ तीन वृद्धाश्रम दिल्लीमध्ये आहेत. त्यामुळे हा मोठा वर्ग उतारवयात हाल सोसत जगतो असे दिसते. ज्येष्ठांना वृद्धाश्रमाच्या माध्यमातून जीवनावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनाचे प्रयत्नदेखील तुटपुंजे व अपुरे असल्याची बाब या अभ्यासाद्वारे ढळढळीतपणे समोर येते. त्यासाठी कोणतेही वेगळे प्रयत्न होताना दिसत नाहीत. वृद्धाश्रमांतील परिस्थिती बदलावी अथवा तेथील ज्येष्ठांना चांगले जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे विशेष प्रयत्न शासनस्तरावरून होताना दिसत नाहीत. शासकीय स्तरावरची या विषयातील अनास्था या सर्वेक्षणाद्वारे प्रकर्षाने समोर येते.

भारतीय समाजात आणि एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये घरातील ज्येष्ठांची सामाजिक-



आर्थिक स्थिती व्यवस्थित राहिल, त्यांच्या आयुष्याच्या उतरणीच्या काळात त्यांची सर्वतोपरी काळजी घेतली जाईल आणि त्यांचा कौटुंबिक आधार हरवणार नाही याची दक्षता पूर्वापार घेतली जात होती. मात्र, वेगाने होत असलेल्या नागरीकरणाने भारताच्या समाजव्यवस्थेमध्ये जे झपाट्याने बदल घडून आले त्यातूनच ज्येष्ठ नागरिकांच्या भावनिक, मानसिक, आर्थिक आणि शारीरिक सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न सध्या निर्माण झालेला आहे. शहरी भागांत वाढणारे वृद्धाश्रम हा त्या बदलत्या वास्तवाचा अपरिहार्य असा परिणाम आहे. वृद्धाश्रमांची संख्या वाढत राहणे हे वास्तव स्वीकारावे लागणार असले तरीही ज्येष्ठ नागरिक ही आपलाच अविभाज्य भाग आहे आणि त्यांच्या पुढील एकाकी जीवनात त्यांची नीट काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे या भावनेतून त्यांना मिळणा-या सेवासुविधांची गुणवत्ता सुधारणे, वयोवृद्धांच्या सर्वसाधारण कल्याणाचा स्तर उंचावणे आणि त्या दृष्टीने सर्वच संबंधितांनी विविध स्तरांवर सतत प्रयत्नशील राहणे, ही काळाची गरज आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

जिकडे-तिकडे

# स्मरण...एका प्रतिभाशाली विज्ञानकथाकाराचे

वाङ्मयाच्या विशाल प्रांगणामध्ये 'विज्ञानकथा' या साहित्यप्रकाराचे स्थान आगळेवेगळे आहे. त्याचे म्हणून एक असे स्वायत्त साहित्यिक मूल्य या वाङ्‌मयप्रकाराला आहे. भारतीय आणि विशेषतः मराठी साहित्यविश्वात हा प्रकार फारसा रुजलेला आणि विस्तारलेला नाही हे जरी वास्तव असले तरीही त्यामुळे विज्ञानकथा या साहित्यप्रकाराचे मूल्य कमी होत नाही. भविष्याचा वेध घेणा-या आणि अकल्पित वाटणा-या कल्पनांच्या भरा-या घेत एका नव्या कल्पनाविश्वात घेऊन जाणा-या विज्ञानकथांची सुरुवात झाली ती पाश्चिमात्य देशांत. त्याच्या प्रभावामुळे भारतीय साहित्यविश्वातही विज्ञानकथा लेखन होऊ लागले.

विज्ञानकथांच्या विश्वात आज डोकावण्याचे प्रमुख कारण म्हणजे, प्रख्यात अमेरिकी विज्ञानकथा लेखक Isaac Asimov (अमेरिकी उच्चारानुसार आयझॅक ॲसिमॉव्ह) यांचे जन्मशताब्दी वर्ष सध्या साजरे होते आहे. त्या निमित्ताने विज्ञानकथांच्या वाटचालीतील त्यांचे योगदान आणि विज्ञानकथांचा झालेला प्रवास याचा मागोवा घेणे उचित ठरावे.

पहिली विज्ञानकथा लिहिली गेली त्याला आता जवळपास २०० वर्षे उलटून गेलेली आहेत. प्रामुख्याने विज्ञानकथा दोन प्रकारांनी सादर केल्या जातात. एक म्हणजे 'सायन्स फिक्शन' आणि दुसरे म्हणजे 'सायन्स फँटसी'. पहिल्या प्रकारामध्ये वैज्ञानिक आविष्कारांचे प्रगटीकरण असते तर दुस-या प्रकारामध्ये कल्पनाविश्वातील भरारी असते. वैज्ञानिक कल्पनाविश्वातील भरारीची सुरुवात १४८८ मध्ये चित्रांच्या रूपाने झाली. लिओनार्दो द विंची या प्रतिभाशाली कलावंताने 'फ्लाइंग मशीन' ही कल्पना चित्रातून साकारली होती. मात्र त्यात कथाबीज नसल्याने त्याला कथेचे स्वरूप येऊ शकले नाही. त्या नंतर इंग्रजी भाषेतील एक महान कवी P. B. Shaily यांची पत्नी Merry Shaily यांनी वयाच्या अवघ्या २१व्या वर्षी 'फ्रँकेस्टाइन' नावाची एक विज्ञानकथा १८१८मध्ये लिहिली. पाश्चिमात्य विश्वातील ही पहिली विज्ञानकथा समजली जाते. त्या नंतरच्या काळात Jules Verne या फ्रेंच लेखकाने विज्ञानकथांच्या निर्मितीमध्ये



महत्त्वपूर्ण असे योगदान दिले. १८६३ साली 'फाइव्ह वीक्स इन द बलून' ही त्यांची कादंबरी प्रकाशित झाली आणि विशेष गाजली. 'फ्रॉम अर्थ टू द मून', 'अराउंड द वर्ल्ड इन ८० डेज' अशी ६० हून अधिक वैज्ञानिक पुस्तके त्यांनी लिहिली आणि वैज्ञानिक कथाविश्वात एक मानदंड प्रस्थापित केला. एच. जी. वेल्स यांनी आपल्या विज्ञानकथा लेखनातून या लेखनप्रकाराला एक साहित्यिक दर्जा मिळवून दिला आणि विज्ञानकथांना एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले.

याच मालिकेमध्ये एक आणखी नाव होते ते म्हणजे Isaac Asimov यांचे. प्रख्यात अमेरिकी लेखक आणि बोस्टन विद्यापीठातील जीवरसायनशास्त्राचे प्राध्यापक अशी त्यांची ओळख सुपरिचित आहे. त्यांच्या लेखनप्रवासात त्यांनी ५०० हून अधिक पुस्तकांचे लेखन, संपादन केले. त्या काळात जगभरातील आघाडीच्या विज्ञान लेखकांमध्ये Isaac Asimov यांचे नाव अग्रणी होते. त्यांची 'फाउंडेशन' या नावाने साकारलेली विज्ञानमालिका विशेष गाजली. त्याचप्रमाणे 'गॅलेक्टिक एम्पायर' आणि 'रोबो'वर आधारित मालिका खूप लोकप्रिय झाल्या. वैज्ञानिक आधार असलेल्या शेकडो लघुकथांचेही लेखन त्यांनी केले. सामाजिक आशय असणा-या विज्ञान लघुकथाही त्यांनी लिहिल्या. या लेखनवैभवाची दखल घेत त्यांच्या 'नाइटफॉले' या लघुविज्ञानकथेला तिथवरची सर्वोत्तम विज्ञानकथा असल्याचा मान अमेरिकेतील नागरिकांनी दिला. ॲसिमौंव्ह यांनी गूढकथा आणि काल्पनिक कथांचेही विपुल लेखन केले.

ॲसिमौंव्ह यांचा जन्म झाला रशियामध्ये. त्याचे आईवडील धर्माने ज्यू होते. वडिलांचे सर्व शिक्षण धार्मिक वातावरणात झालेले असले तरीही त्यांनी ॲसिमौंव्हसह आपल्या कोणत्याही मुलांवर धार्मिक गोष्टी कधीही लादल्या नाहीत. १९२१च्या सुमारास ॲसिमॉव्ह यांना न्यूमोनिया झाला. त्यांतून ते कसेबसे वाचले. पुढे हे सारे कुटुंब १९२३ मध्ये अमेरिकेत येऊन स्थायिक झाले. बालपणापासूनच इंग्रजी भाषेचे संस्कार मन व बुद्धीवर घडल्याने तीच भाषा अंगवळणी पडत गेली. घरची परिस्थिती तशी बेताची होती. त्यामुळे ॲसिमॉव्ह यांचे आईवडील मिळून एक छोटेसे दुकान चालवत. तिथे वर्तमानपत्रे आणि मासिके विक्रीसाठी ठेवली जात. असिमौंव्ह यांची वाचनाची भूक तिथे भागत असे.

ॲसिमौंव्ह यांची शैक्षणिक कारकीर्द चांगली राहिली. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेताना सुरुवातीला काही अडचणी आल्या. परंतु त्यावर मात करीत १९४८ मध्ये त्यांनी रसायनशास्त्र या विषयामध्ये डॉक्टरेटची पदवी संपादन केली. उच्च

शिक्षण घेत असताना त्यांनी फ्रेंच आणि जर्मन या दोन भाषांवरही प्रभुत्व मिळवले. बॉस्टन विद्यापीठाच्या औषधनिर्माण विभागामध्ये १९४९ मध्ये ते रुजू झाले. याचदरम्यान, ॲसिमॉव्ह यांनी विज्ञानकथांचे लेखन सुरू केले. परंतु त्यामुळे विद्यापीठातील संशोधनाकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले. अपेक्षित असलेले संशोधन होत नसल्याचा ठपका ठेवून त्यांचे काम विद्यापीठाने काही काळ थांबवले होते; परंतु, विज्ञानकथा लेखनाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षात घेऊन त्यांना जीवरसायनशास्त्राचे पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून बढतीही देण्यात आली. साहित्यविश्वात लेखनाच्या रूपाने योगदान देणा-या लेखकाचा हा एकप्रकारे गौरवच होता. मुक्त लेखनस्वातंत्र्याच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट त्यांनी कायमच निर्लेप मनाने नाकारली आणि लेखनाला कायमच प्राधान्य दिले. ॲसिमॉव्ह हे विज्ञानाचे अभ्यासू प्राध्यापक तर होतेच पण त्याचबरोबर ते उत्तम वक्तेही होते. विज्ञानाच्या प्रसारासाठी ते सातत्याने व्याख्याने देत असत.

अगदी लहान वयातच त्यांचे नाते विज्ञानकथांशी जोडले गेले होते. वडिलांच्या बरोबरीने दुकानात असताना काही मासिके त्यांच्या हाती पडली त्यातून विज्ञानाविषयीची गोडी त्यांच्या मनात निर्माण झाली. ही निर्माण झालेली आवड अधिक जोपासण्यासाठी वयाच्या १८व्या वर्षी ते 'फ्युचरियन्स' नावाच्या विज्ञानकथांवर प्रेम करणा-या लोकांनी स्थापन केलेल्या एका गटामध्ये सहभागी झाले. तसे पाहायचे झाले तर ॲसिमौंव्ह यांनी वयाच्या ११ व्या वर्षीच लेखनाला सुरूवात केलेली होती. व्यावसायिक स्तरावर मात्र प्रत्यक्षातील लेखन अवतरले ते १७ मे १९३८ रोजी. 'cosmic corkscrew' या नावाने ही विज्ञानकथा लिहिली. बहुतांश मोठ्या लेखकांच्या नशिबी येते तशीच नकारघंटा प्रकाशनाच्या बाबतीत ॲसिमॉव्ह यांच्याही वाट्याला आली. 'स्ट्रीट अँड स्मिथ पब्लिकेशन' नावाच्या प्रकाशनसंस्थेत त्यांनी व्यक्तिशः जाऊन संपादक जॉन कॅम्पबेल यांच्याकडे ती कथा दिली. दोन दिवसांत ही कथा साभार पोच आली आणि त्याच्याजोडीला ही कथा का नाकारत आहोत याचे स्पष्टीकरण देणारे संपादकांचे भले मोठे पत्रदेखील आले. त्याच महिन्याच्या अखेरीस त्यांनी आणखी एक कथा लिहून पुन्हा त्याच संपादकांकडे पाठवली. त्यांनी तीदेखील नाकारली. मात्र नकार देताना 'तुझी कल्पनाशक्ती चांगली आहे.' अशा शब्दांत कौतुकाची पोचपावती लाभल्याने नाउमेद न होता ॲसिमॉव्ह यांनी लेखन सुरू ठेवले. त्यांनी लिहिलेली 'Maroon off Vista' ही तिसरी कथा मात्र १९३९ सालातील मार्च महिन्यात प्रथमतः प्रकाशित झाली. त्या वर्षी आणखी दोन चांगल्या विज्ञानकथा प्रकाशित झाल्या. 'फाउंडेशन' या



त्यांच्या कादंबरीच्या तिन्ही भागांना वाचकांचा मोठा प्रतिसाद लाभला. 'The Caves of Steel' आणि 'The Naked Sun' या पुस्तकांनाही वाचकांची विशेष पसंती लाभली. ॲसिमौंव्ह यांनी 'रोबो'विषयीच्या कथा-कादंब-या लिहित असताना त्यांची तीन प्राथमिक तत्त्वे मांडलेली होती. ती इतकी लोकप्रिय झाली की प्रत्यक्ष रोबोची निर्मिती होताना देखील या मूलभूत तत्त्वांचा विचार होत असावा असा कित्येकांचा समज होता. ॲसिमॉव्ह यांनी १९४१ साली लिहिलेल्या 'लायर' नावाच्या एका कथेमध्ये 'रोबोटिक्स' हा शब्द प्रथमतः योजला. त्या नंतर हा शब्द प्रचलित होत गेला. याच धर्तीवर 'Positronic' आणि 'सायकोहिस्ट्री' हे शब्द प्रथमतः त्यांनीच योजले. ॲसिमॉव्ह यांना इतिहास या विषयातही विशेष रुची होती. त्यामुळे त्यांनी या विषयावर आधारित १४ पुस्तके लिहिली. गूढकथा लेखक म्हणूनदेखील ॲसिमॉव्ह यांची वेगळी ओळख त्यांच्या लेखनातून जनमानसात तयार झाली.

ॲसिमौंव्ह यांच्या लेखनविषयक कारकिर्दीवर एक साधी नजर जरी टाकली तरी त्यांनी दोन स्वतंत्र प्रकारांचे लेखन त्यांच्या सर्जनपर्वादरम्यान केले, असे आपल्या ध्यानात येते. सुरूवातीच्या काळात त्यांचा भर विज्ञानकथा आणि विज्ञानविषयक लघुकथांवर अधिक होता. नंतरच्या काळात मात्र वास्तववादी विज्ञानलेखन करण्यावर त्यांनी लक्ष अधिक केंद्रित केल्याचे दिसून येते. तरु ण मुले डोळ्यांसमोर ठेवून ॲसिमौंव्ह सुरूवातीला लेखन करीत असत. परंतु, नव्या युगाची पावले ओळखून दूरचित्रवाणीवर रूपांतरित होऊ शकतील अशा स्वरूपाच्या कथा लिहिण्याविषयी त्यांच्या संपादकांनी त्यांना सुचवले. त्या सूचनावजा कल्पनेला प्रतिसाद देत ॲसिमॉव्ह यांनी 'Biochemistry and Human Metabolism' हे विज्ञानकथेच्या चौकटीपलीकडचे पुस्तक लिहिले.

विज्ञानकथालेखन आणि काल्पनिक वैज्ञानिक कथा निर्मिती या क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर दिला जाणारा 'ह्युगो पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला. 'I. Asimov: A Memoir' या आत्मचरित्रामध्ये आपल्या विज्ञानकथालेखनाच्या वाटचालीचा सविस्तर आढावा त्यांनी घेतलेला आहे. १९७७ साली ॲसिमॉव्ह यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्या नंतर त्यांची बायपास शस्त्रक्रियाही करण्यात आली. या उपचारादरम्यान त्यांना रक्तसंक्रमणातून एच.आय.व्ही.ची लागण झाली. पुढे ६ एप्रिल १९९२ रोजी त्यांचे प्रदीर्घ आजाराने न्यूयॉर्क शहरात ॲसिमॉव्ह यांचे निधन झाले. ■■

*(पृष्ठ क्रमांक १८ वरून)*

या प्रश्नाचे व्यवहारातील रूपांतर काय होते, याचा आपण व्यवस्थित उलगडा करून घ्यावयास हवा. आपल्या देशाच्या आजवरच्या ७० वर्षांच्या प्रवासादरम्यान आज प्रथमच असे होते आहे की, आपल्या देशातील लोकशाही आणि आपला राष्ट्रवाद यांत द्वैत निर्माण केले जाते आहे. आपल्या देशाचा गेल्या ७० वर्षांचा आणि त्याच्याही आधी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास असे सांगतो की, लोकशाही आणि राष्ट्रवाद या परस्परविरोधी नव्हेत तर एकमेकांना पूरक अशा दोन बाबी होत ही जाणीव गेली १००-१५० वर्षे या समाजाने आणि इथल्या नेत्यांनी सतत जोपासली. आमची लोकशाही आमचा राष्ट्रवाद समृद्ध बनवते आणि आमच्या राष्ट्रावरचे आमचे प्रेम आमची लोकशाही समृद्ध करते, अशी आपली आजवरची धारणा होती व आहे. आता मात्र आपल्या पुढ्यात दुहेरी पेच निर्माण केला जातो आहे. एकीकडे प्रश्न आहे आपल्या अस्तित्त्वाचा, म्हणजेच, आपण भारतीय आहोत म्हणजे नेमके काय व कोण आहोत, भारतीय असणे म्हणजे नेमके काय, असा. तर, दुसरीकडे, राष्ट्र व लोकशाही यांचे द्वैत मानायचे की त्या दोहोंदरम्यान ऐक्य कल्पायचे, हा दुसरा प्रश्न. हे प्रश्न केवळ या निवडणुकीपुरते मर्यादित नाहीत. कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर आले तरी पुढील किमान १० वर्षे तरी एक समाज म्हणून या प्रश्नांबाबत आपल्याला डोईफोड करावी लागणार आहे. त्यांमुळे, २०१९ सालातील निवडणुकीचे निकाल कोणत्याही प्रकारे लागले तरी, एक प्रश्न आपल्याला सतत मनाशी जागता ठेवावा लागेल. निवडणुकीमध्ये निवडून येणा-या पक्षाला अशा प्रकारचे मौलिक बदल आपल्या समाजाच्या स्वभावामध्ये घडवून आणण्याचा अधिकार असतो का, हा तो सर्वांत गंभीर प्रश्न ! ■■

**संदर्भ :**

1) Government Of India, Elderly in India Report 2016
2) https://www.helpageindia.org
3) Economic and Political Weekly, Survey of old age homes in Delhi, 16 march 2019.
4) https://www.britannica.com/biography/Isaac-Asimov
5) https://www.biography.com/writer/isaac-asimov ■■



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## FDI in INDIA

**HISORY, POLICY and the ASIAN PERSPECTIVE**
**Authors : Manoj Pant with Deepika Srivastava**
**Orient BlackSwan Pvt. Ltd., Hyderabad, 500 029,**
**Pp. xix + 298, Price - Rs. 695/-.**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात विचार करायचा झाला तर ‘थेट परकीय गुंतवणूक’ हा विषय कायमच महत्त्वाचा राहिलेला आहे. विशेषतः भारताने आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतर एकूणच अर्थव्यवस्थेचे रूप पालटले. त्यात मोठा वाटा अर्थातच थेट परकीय गुंतवणुकीचा आहे. त्यामुळे थेट परकीय गुंतवणुकीला मान्यता देण्यापूर्वीची भारताची अर्थव्यवस्था, १९९१ नंतरच्या दशकात तिच्यामध्ये होत गेलेले मोठे बदल आणि या निर्णयामागील अंतर्विरोध या सर्वांचा एक व्यापक पट प्रस्तुत ग्रंथात उलगडताना दिसतो. राजकीय परिप्रेक्ष्यामध्येही थेट परकीय गुंतवणूक कायमच वादग्रस्त राहिलेला विषय आहे. त्या पार्श्वभूमीवर १९८० सालापासून थेट परकीय गुंतवणुकीबाबत असलेले भारताचे धोरण, १९९१ सालच्या आर्थिक उदारीकरणानंतर त्यांत झालेले लक्षणीय बदल, १९९५ सालानंतर घडून आलेले मोठे स्थित्यंतर आणि त्या नंतरचा २००० सालापर्यंतचा प्रवास असे विविध टप्पे उलगडताना भारताची आर्थिक दिशेने होत गेलेली वाटचालही स्पष्ट होते. थेट परकीय गुंतवणूकीसाठी आकर्षित करण्यासंदर्भात जागतिक स्तरावर भारताची ज्यांच्याशी स्पर्धा आहे त्या आशिया खंडातील चीन, मलेशिया आणि सिंगापूर या देशांच्या संदर्भात थेट परकीय गुंतवणुकीबाबतचे देशाचे धोरण कसे आहे, याबाबत विस्तृत उहापोह केलेला आहे. थेट परकीय गुंतवणुकीबाबतचे सद्यःस्थितीतील धोरण, देशांतर्गत आणि परदेशी कंपन्यांमध्ये निर्माण होणारी स्पर्धा, व्यापारउदिमावर होणारे दीर्घकालीन परिणाम यांसारख्या पैलूंचाही परामर्श यात घेण्यात आला आहे. उदारीकरण आणि जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर साकारलेल्या महत्त्वपूर्ण स्थित्यंतरांचा संशोधनपूर्ण आणि विश्लेषक मागोवा अर्थशास्त्र तसेच वाणिज्य शाखेच्या विद्यार्थीवर्गासह अर्थविषयक तज्ज्ञ आणि संशोधकांसाठी निश्चितच उद्बोधक व उपयुक्त ठरावा, असा आहे. ■■



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■‘इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’ ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (‘जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’) चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून ‘अर्थबोध’, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**